# उपजीविकेचा स्तर उंचावण्याची गरज

## प्रा. देसाई : 'गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र'चा पदवीप्रदान समारंभ



**गोखले इन्स्टिट्यूट, पुणे : गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेच्या पदवीप्रदान समारंभानंतर आनंद व्यक्त करताना पदवीधारक विद्यार्थी.**

**पुणे, ता. २४ :** आकडेमोडीच्या पलीकडे जात अर्थतज्ज्ञांनी जगण्याचा विचार करायला हवा. सर्वसामान्य व्यक्तीच्या उपजीविकेचा स्तर उंचावण्यासाठी त्यांनी काम केले पाहिजे, असा सल्ला ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे प्रा. मेघनाद देसाई यांनी विद्यार्थ्यांना दिला. गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेच्या पदवीदान समारंभात ते बोलत होते.

कार्यक्रमाला संस्थेचे कुलपती डॉ. राजीव कुमार, कुलगुरू डॉ. अजित रानडे, हिंद सेवक समाज संस्थेचे विश्वस्त मिलिंद देशमुख आदी उपस्थित होते. प्रा. देसाई यांनी यावेळी 'गरिबीचे राजकीय अर्थशास्त्र' या विषयावर काळे स्मृती व्याख्यान दिले. सर्वसामान्यांचे हीत जोपासत राजकीय अर्थशास्त्राद्वारे जीवन आणि उपजीविकेचा उद्धार हे लक्ष ठेवले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. दोन वर्षानंतर प्रथमच संस्थेचा पदवी प्रदान समारंभ पार पडला. यावेळी २०१९-२० आणि २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. कुलसचिव कर्नल कपिल जोध यांनी आभार मानले.